Historicity researcH Journal

# दुग्धव्यवसायातील महिलांचे आर्थिक सबलिकरण



**सुप्रिया शिवाजी जगताप**
**(संशोधक विद्यार्थिनी) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

## प्रस्तावना:

शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय हा पूर्वीपासून परंपरागत चालत आलेला महत्वाचा व्यवसाय आहे. दुग्ध व्यवसायासाठी प्रामुख्याने संकरीत गाई , गावठी दूधाळ गाई व म्हशी पाळल्या जातात. प्रचलित पद्धतीने दुग्ध व्यवसाय न करता आधुनिक तंत्रांचा वापर करून व्यावसायिक दृष्ट्या हा व्यवसाय केला असता निश्चितपणे शाश्वत व आर्थिकदृष्ट्या चांगला परवडणारा व्यवसाय आहे. भारतात ८० हजार गावातून दहा कोटी शेतकरी सहकारी तत्वावर दुधाचे उत्पादन घेतात. भारतात सर्वप्रथम १९४६ मध्ये गुजरातमधील खेडा जिल्ह्यात सहकारी तत्वावर दुग्ध संस्था स्थापन झाली. या जिल्ह्यातील ४०० खेड्यांमधे ‘ प्राथमिक दुग्ध सहकारी संस्थांची ‘ स्थापना होऊन जिल्हा पातळीवर “ कैरा मिल्क यूनियन “ ची आनंद येथे स्थापना झाली. ज्यात प्राथमिक संस्थेकडून दूध घेऊन जिल्हा संस्थेकडे पाठवले जाते. शिलकी दुधाचे लोणी तूप बनवले जाते. भारतात या संस्थेचे पदार्थ ‘ अमूल ‘ या नावाने प्रसिद्ध आहेत.

## संशोधनाची उद्दिष्टे -

१) दुग्ध व्यवसायातील महिलांच्या समस्यांचा आढावा घेणे.
२) दुग्ध व्यवसायातील महिलांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.
३) दुग्ध व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्व अभ्यासणे.

## संशोधन पद्धती -

सदर संशोधन लेखासाठी द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. ‘भारतीय अर्थव्यवस्था’, सहकाराचा विकास ‘इत्यादि संबंधित संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यात आला आहे. दुग्ध व्यवसायातील यशस्वी व्यक्तींसंबंधित मासिके, लेख यांचा अभ्यास केला आहे. त्याचबरोबर इंटरनेट, ऑनलाइन वेबसाईट तसेच वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथिंमधून संकलित केलेली आहे.

## भारतीय अर्थव्यवस्थेतील दुग्ध व्यवसायाचे महत्व -

भारत जगातील सर्वात मोठा दुध उत्पादक देश असून जगातील २२% उत्पादन हे भारतात होते. त्याखालोखाल अमेरिका, चीन , पाकिस्तान आणि ब्राझील यांचा क्रमांक लागतो. २०१८-१९ मध्ये पशू दुग्ध व्यवसाय मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार , भारताची दुग्ध निर्यात १२६ टन झाली आहे. त्यापासून अंदाजे २,७०० कोटी रुपयांचे उत्पादन झाले आहे. स्कीम्ड दुधाच्या पावडरची निर्यात सर्वाधिक वाढते आहे. असे असले तरी हा उद्योग मोठ्या प्रमाणावर असंघटित आहे. तसेच ग्रामीण भागातील दुधाची उत्पाकता फार कमी आहे. शिवाय देशांतर्गत दुधाच्या दरात सतत होत असलेल्या चढ उतारांमुळे दूध व्यवसाय शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसतो.

जगभरात दूध व्यवसायचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते. आहारदृष्ट्या प्रत्येकाला प्रतिदिन ३०० मिलि दुधाची गरज भासते. या वाढत्या लोकसंख्येची गरज भागवण्यासाठी दूधाच उत्पादन वाढणे गरजेचे आहे. आपल्याकडे गाईंपासून ४५% तर म्हशींपासून ५२% दूध मिळते. दूध हा व्यवसाय केवळ शेतीला पूरक व्यवसाय ही संकल्पना काळाच्या ओघात बदललेली आहे. कारण दूध व्यवसायालाच अधिकचे महत्व दिले जात आहे. दुग्ध व्यवसाय विकसित करण्याच्या दृष्टीने भारत सरकारने डॉ. कुरियन व श्रीमती अमृता पटेल यांच्या नेतृत्वाखाली १९७१ मध्ये ‘ दुधाचा महापुर ‘ ही योजना अमलात आणली. तसेच दूध व्यवसायाचा विकास होण्यासाठी सरकारने सर्वसमावेशक अशी विकास योजना तयार केली ज्यामुळे दुधाच्या उत्पादनात प्रचंड वाढ घडून आली. केवळ पुरुषांनीच हा व्यवसाय करावा असे नाही तर महिलांनीही वेगवेगळे अभिनव प्रयोग यात केले आहेत. गुजरातमधील महिला याचे उत्तम उदाहरण आहेत. या महिलांनी केवळ व्यवसायालाच सुरुवात केली नाही तर पुरुषांपेक्षा हा व्यवसाय उत्तमरीत्या करून दाखवला आहे. त्यामुळे अमूल डेअरीने याची दखल घेतली आहे.

शेतीचा जोड धंदा म्हणून जरि दूध व्यवसायाची ओळख असली तरी याच व्यवसायात सातत्य आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांचा वापर केला तर काय होते हे गुजरात येथील महिलानी दाखवून दिले आहे. या व्यवसायातून उत्पादनच नाही तर अनेक महिलांच्या हाताला काम मिळाले आहे. अमूलने अशा दूध व्यवसायात यशस्वी झालेल्या १० महिलांची नावे जाहीर केली आहेत. ज्यांची कमाई वर्षाकाठी कोट्यावधींची आहे. या महिलांच्या यशोगाथेमुळे अनेकांना प्रेरणा मिळाली आहे . फक्त दुधाचा व्यवसाय असा आहे ज्याची मागणी कधीच कमी होत नाही. दूध किंवा त्यापासून बनवले जाणारे पदार्थ हे दोन्हीही व्यवसाय असे आहेत जे कधीही अयशस्वी ठरत नाहीत.

दूध व्यवसायातील यशाबद्दल केवळ पुरुषच नाही तर महिलाही पुढे येत आहेत. संपूर्णपणे महिलांनी चालवलेला महाराष्ट्रातील पहिला दुग्धव्यवसाय पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात सुरू झाला. टाटा पावरच्या सहकार्याने येथील महिलांनी ‘मावल डेअरी फार्मर सर्विसेस प्रोड्यूसर कंपनी’ ची स्थापना केली. यादवारे सर्वसामान्य शेतकरी ते कृषि उद्योजिका असा मोठा टप्पा या महिलांनी पार केला आहे. त्यांनी दूध विकून वर्षाकाठी कोट्यवधी रुपये कमावले आहेत. त्यामुळे दूध व्यवसायात महिला पुरुषांपेक्षा एक पाऊल पुढे आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

### दूध व्यवसायातील यशस्वी महिला -

दूध व्यवसायातील महिलांचा वाढता सहभाग आणि त्यांची यशस्वीता बघता अमूल डेअरीने या व्यवसयात भरघोस उत्पादन घेणाऱ्या १० यशस्वी महिलांची यादी जाहीर केली आहे. ती पुढीलप्रमाणे-

### १) नवलबेन चौधरी -

दूध व्यवसाय भरघोस उत्पन्न घेणाऱ्या महिलांच्या यादीत प्रथम क्रमांकावर नवलबेन चौधरी यांचे नाव घेतले जाते. नवलबेन यांनी गेल्या वर्षी २,२१,५९५ लीटर दूध विकून ८७.९५ लाख रुपयांची कमाई तर केलीच पण यातून इतर बऱ्याच महिलाच्या हाताला काम दिले.

### २) मालवी कानूबेन -

२,५०,७४५ लीटर दूध विकून त्यातून ७३.६६ लाख रुपयांची कमाई करून मालवी कानूबेन दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

### ३) छवडा हनसाबा -

यांनी ७२.१९ लाख रुपयांची कमाई करून तिसरे स्थान मिळवले आहे.

### ४) लोह गंगाबेन गणेशभाई -

या चौथ्या क्रमांकवर असून यांनी सुमारे २ लाख लीटर दूध विकून ६४.४६ लाख रुपयांची कमाई केली आहे.

### ५) रावबरी देवीकबेन -

या पाचव्या क्रमांकावर आहेत. यांनी वर्षातून १.७९ लाख लीटर दुधाची विक्री करून ६२.२० लाख रुपये कमावले आहेत.

### ६) लीलाबेन राजपूत -

या सहाव्या स्थानावर आहेत. त्यांची वर्षाकाठी ६०.८७ लाख रुपयांची कमाई आहे.

### ७) बिस्मिल्लाबेन उमतीया -

यांनी ५८.१० लाख रुपयांची कमाई करून सातवे स्थान निश्चित केले आहे.

### ८) साजीबेन चौधरी -

साजीबेन चौधरी यांनी १,९६,८८२ लीटर दूध विकून ५६.६३ लाख रुपयांची कमाई केली आहे.

### ९) नासिफाबेन अगलाडिया -

यांनी ५३.६६ लाख रुपये कमवून नववे स्थान मिळवले आहे.

**१०) लीलाबेन धूलिया -**

**यांनी दूध उत्पादनातून ५२,०२,३९६ रुपये कमवून दहावे स्थान पटकावले आहे.**

## दूध व्यवसायातील महिलांचे सबलिकरण

### स्वयं रोजगाराला चालना -

**पशुधन हे देशाच्या अर्थव्यवस्थेमधील एक महात्वपूर्ण क्षेत्र आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राचे महत्व कमी झाले असले तरी शेतीला पूरक असणाऱ्या दुग्ध व्यवसायातून कोट्यवधी ग्रामीण जनतेला रोजगार उपलब्ध होतो. ज्यासाठी कुठल्याही प्रकारच्या शिक्षणाची अट नाही. त्यामुळे अगदी कुणीही हा व्यवसाय करू शकतो . विकसनशील अर्थव्यवस्थेत भूमिहीन आणि गरीब शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून महत्वपूर्ण भूमिका पार पाडते. विशेषत: महिलाना रोजगाराच्या संधि मिळवून देण्यात दूध व्यवसायाचा मोलाचा वाटा आहे. सध्याच्या काळात महिला या व्यवसायातून लाखोंचा नफा कमवून इतर महिलांनाही रोजगार उपलब्ध करून देत आहेत. त्यामुळे दुग्ध व्यवसाय हा स्वयंरोजगाराला चालना देणारे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्वाचे क्षेत्र आहे.**

### नियमित उत्पन्न हमी -

**दूध व्यवसाय हा असा एकमेव व्यवसाय आहे जो नियमितपणे उत्पन्न मिळवून देतो. ज्यातून दैनंदिन आर्थिक गरजा भागवणे शक्य होते. लोनि , तूप , चीज , मलाई , दही या प्रकारच्या पदार्थांचा रोजचा वाढता वापर यामुळे दिवसेंदिवस रोजच्या आयुष्यात दुधाचे महत्व वाढत आहे. हा व्यवसाय महिलानासुदधा अगदी सहज करता येतो. आणि नियमित हातात पडणाऱ्या उत्पन्नामुळे महिलांचा या व्यवसायाकडे जाण्याचा कल वाढला आहे.**

### उत्पन्न व बचत वाढ -

**रोजच्या जीवनात दुधाच्या वाढत्या वापरामुळे दुधाच्या मागणीतही वाढ दिसून येत आहे. त्यामुळे दुधापासून नियमित मिळणाऱ्या उत्पन्नातही वाढ घडून येत आहे. तसेच आधुनिक तंत्राच्या वापरामुळे उत्पादनात वाढ होऊन उत्पन्नही वाढत आहे. तसेच यातून मिळणारे उत्पन्न नियमितपणे हातात येत असल्याने दैनंदिन गरजा भागवून उरणारे उत्पन्नाची बचत होते. यामुळे महिला आर्थिक स्वावलंबी होताना दिसून येत आहेत.**

### राहणीमानात सुधारणा -

**शेती हा व्यवसाय अनिश्चित असल्याने त्यातून मिळणारे उत्पन्नही कमीच असते. ज्यामुळे शेतकरी किंवा गरीब लोकांच्या राहणीमानाचा दर्जा निकृष्ट होतो. परंतु दूध व्यवसायातून नियमितपणे व भरघोस मिळणाऱ्या उत्पन्नामुळे रोजच्या गरजा भागून उत्पन्न शिल्लक राहते ज्यातून त्यांना त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडून येण्यास मदत होते.**

## समारोप -

**अशा प्रकारे या महिलांनी भारताच्या इतिहासात आपल्या नावाची नोंद करून घेतली आहे. महिलांनी दूध व्यवसायात सक्रिय व्हावे यासाठी सरकरकडूनही विशेष प्रयत्न होत आहेत. जेणेकरून महिलांच्या आर्थिक सबलीकरन होऊन त्या स्वावलंबी व्हाव्यात आणि त्यांची स्वत:ची अशी वेगळी ओळख निर्माण व्हावी.**

## संदर्भ सूची


१) **डॉ. ना.पू. दक्षिणकर, दुग्ध व्यवसाय विस्तार, श्री मंगेश प्रकाशन नागपुर. पान नं १८६.**

२) **देसाई भालेराव (२००६) 'भारतीय अर्थव्यवस्था' निराळी प्रकाशन पुणे.**

३) **भोसले, काटे (२००२) 'सहकारचा विकास 'फडके प्रकाशन, कोल्हापूर.**

४) **htpp://www.nddb,org/statics/livestock/sector 9d 10.html.**